**प्रेस नोट** **२६/०८/२०२३**

**साकीनाका पोलीस ठाणे , मुंबई जुन २०२२ ते जुलै २०२३ या कालावधीत एकुण हरविलेलेले व चोरीला गेलेले १०० मोबाईल तसेच ०२ लॅपटॉप चोरी, ०१ मंदिरातील देवाची चांदीची मुर्ती व १ मोटार वाहन चोरीचा हस्तगत मुद्देमाल तक्रारदार यांना परत केलेबाबत.**

साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई येथे सन २०२२ ते ऑगस्ट २०२३ मध्ये नागरिकांनी लॅपटॉप, मंदिरातील देवाची चांदीची मुर्ती, मोटार वाहन चोरी तसेच मोबाईल हरविलेबाबत व चोरी झाल्याबाबत तक्रारी दिलेल्या होत्या. नागरीकांच्या तक्रारीची दखल घेवुन साकीनाका पोलीस ठाणे हददीतील चोरी झालेले तसेच हरविलेल्या मोबाईल चे तांत्रिक विश्लेषण करून त्यांचा शोध घेतला. तसेच इतर मुद्देमाला संदर्भातील गुन्हयाच्या तपास करून सदर मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. सदरचे मोबाईल हे बृहन्मुंबई, पालघर, मिरारोड तसेच इतर राज्य कर्नाटक, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल अशा बाहेरील राज्यातुन गेल्या दोन महिन्यापासुन सातत्याने प्रयत्न करून विविध कंपन्यांचे १०० मोबाईल व वर नमुद इतर मुद्देमाल एकुण अंदाजे किंमत २८,००,०००/- (अठ्ठावीस लाख) रूपये ची मालमत्ता दि.२६/०८/२०२३ रोजी तक्रारदार यांना मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ १० मुंबई श्री. दत्ता नलावडे यांचे हस्ते परत करण्यात आली.

**परत करण्यात आलेला मुद्देमाल खालीलप्रमाणे**

**वेगवेगळया कंपन्यांचे मोबाईल, लॅपटॉप , मंदिरातील देवाची चांदीची मुर्ती व मोटार वाहन एकुण अंदाजे किंमत २८,००,०००/- रूपये**

सदर यशस्वी कामगीरी मा.पोलीस सह आयुक्त (का व सु ) श्री.सत्यनारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. परमजितसिंह दहिया, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१०, श्री. दत्ता नलावडे, मा. सहायक पोलीस आयुक्त साकीनाका विभाग, श्री.भारतकुमार सुर्यवंशी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. गबाजी चिमटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक योगेश शिंदे (गुन्हे) यांचे प्रत्यक्ष देखरेखी खाली सहा.पोलीस निरीक्षक वाल्मीक कोरे, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र नागरे, पोहक्र.दिपक कदम, पो.ह.चंद्रकांत पवार, पो.शि.रिकी सौदरमल, पो.शि.परेश शिगवण, पो.शि अनिल करंडे, पो.शि.अय्याज शेख यांनी पार पाडली.